१५६९/८४

जा.क्र.प्रा.प्राशि-३/खाप्राशा/मान्यता/पुवि
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 17 JUL 2004

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, पुणे.

**विषय** : सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत (माध्यम - इंग्रजी). . .

**संदर्भ** : शालेय शिक्षण विभागाकडील शासन पत्र क्रमांक पीएलएस-२००४/(२६०/२००४)/प्राशि-३, दिनांक २२ जून. २००४

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या यादीतील प्राथमिक शाळांना त्याच्या नावासमोर दर्शविलेल्या माध्यमातून सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव व संपूर्ण पत्ता | प्रस्तावित शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | हरदेवसिंहबाब एज्युकेशन सोसायटी, भोसरी | वाकी खुर्द, चाकन | इंग्रजी | १ ली |

**कायम विनाअनुदानीत**

त्यामुळे या संस्थांकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह १५ दिवसाच्या आत या कार्यालयास सादर करावा.

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधित संस्थांना परवानगी देणे/न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रार आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेश समाधानकारक आहे
६. संस्थेने विहित नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही
७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे
१०. सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच मान्यता प्रदान करावी.
११. सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संबंधित संस्था उघडणार नाही, असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबंधित शाळा काढणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१३. संस्थेस ज्या वर्षी शाळेस परवानगी द्यावयाची आहे. त्यावर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षीच्या शाळा नुतनीकरणासाठी परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षातच अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.
१४. संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना-अनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही हे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करून ठेवाव्यात.
१५. संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यात यावी. (उदा. नाव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता.)

स्थळप्रतीवर मा. शि. उ. सं.
यांची सही आहे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे-१ करिता.

प्रत माहितीस्तव सविनय सादर.

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
३. मा. अध्यक्ष/सचिव, हरदेवसिंहबाब एज्युकेशन सोसायटी, भोसरी.

कायम विनाअनुदानतत्वावर

पुणे जिल्हा परिषद,पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जिप/शिक्षण/प्राथ.२/२२९/०५/खा प्रा२॥
पुणे १ दि.८/५/२००६

प्रति,
मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
प्रियदर्शनीय प्रायमरी स्कूल
वाकी खुर्द, चाकण
ता. खेड जि. पुणे

विषय:-इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदान तत्वावरील शासन मान्यताप्राप्त खाजगीप्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्य प्रथम/जादा तुकडया/वर्गउघडण्यास परवानगी देणे बाबत (माध्यम-इंग्रजी)

संदर्भ:- शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस-१००२/(१०००/०२)/प्राशि-३ दिनांक:-१४ जानेवारी २००३

वरील विषयासंबंधीचा आपणांकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळेस त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्रथम/जादा तुकडया/वर्ग जून २०० पासून सन २०० - २०० या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहेत.

| अ. क्र | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | प्रियदर्शनीय प्रायमरी स्कूल, वाकी खुर्द, चाकण | इंग्रजी | २री | नैसर्गिक वाढीने | मंजूर |

अटी व शर्ती

१)शाळेस शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या नूसार शैक्षणिक व व्यवसायीक अर्हतेचा व आवश्य सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे

२) सदर शाळेने तुकडया साठी सर्व भौतीक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापण विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहीजे.

३) सदर शाळेस स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहीजे.

५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६) सदर शाळेच्या वर्गास/तुकडीत विद्यार्थी संख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.

७) तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी /वर्ग मान्यता रदद करण्यात येईल.

८) पट व उपस्थिती वाढविण्याचे अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

[signature]
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे कार्या

स्थळ प्रतीवर वि. अ.
यांची सही आहे.

प्रत:- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

१) सचिव/अध्यक्ष,
हरदेवसिंह बाबा एज्युकेशन सोसायटी
भोसरी, जि. पुणे

कायम विना अनुदानित तत्वावर
(मराठी,इंग्रजी, हिंदी, उर्दू , तामिळ इत्यादी माध्यम)

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ ७६ /२०१७
पुणे १ दिनांक:- ११/०७/२०१७

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
हरदेवसिंगबाबा एज्युकेशन सोसायटी, भोसरी संचलित प्रियदर्शनी प्रायमरी स्कुल, वाकी खु, चाकण, ता.खेड, जि. पुणे

**विषय:-** कायम विना अनुदान तत्त्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा / **नैसर्गिक वाढीचा** /वाढीच्या प्राथम/ जादा तुकडया /वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.
**संदर्भ :-** शासन निर्णय क्र. व्हीएलएस.-१००२/(१०००/०२)/प्राशि-३, दि.२३ सप्टेंबर २००३

उपरोक्त विषयासंबधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या नैसर्गिक वाढीचा /जादा तुकडया /वर्ग सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | हरदेवसिंगबाबा एज्युकेशन सोसायटी, भोसरी संचलित प्रियदर्शनी प्रायमरी स्कुल, वाकी खु,चाकण, ता.खेड, जि. पुणे | इंग्रजी | इयत्ता ३ री ते ७ वी | नैसर्गिक वाढ | कायम विना अनुदानित तत्वावर |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानूसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना
सचिव/अध्यक्ष :- हरदेवसिंगबाबा एज्युकेशन सोसायटी, ४५/२ इंद्रायणीनगर, भोसरी, पुणे

९६८३२१३४

**तात्काळ**

**कायम विनाअनुदान**

जा.क्र.माध्य.३/१४/नमाशा/पुवि/२००४
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 20 JUL 2004

प्रति

सचिव,
हरदेवसिंग एज्युकेशन सोसायटी,
भोसरी, पुणे २८

**विषय :** **२००४-२००५ या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळांना परवानगी देणेबाबत.**

**संदर्भ :** १. शासन पत्र क्र. नमाशा/१००४/(१६९/०४)/माशि-१, दिनांक २३.६.२००४
२. मा.शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/१००१ के/नमाशा/६५१७०/१५-क, दि. २८.९.२०००

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे.

| अ. क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | हरदेवसिंग एज्यु. सोसा. भोसरी, पुणे २८ | वाकी खु ", ता. खेड | आठवी | इंग्रजी |

**कायम विना अनुदान**

आपल्या शाळेस माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खालील नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवरच नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येणार आहे.

१. इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेसाठी भविष्यकाळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही किंवा विद्यार्थ्यांच्या फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीचे लेखी हमीपत्र सादर करावे.
२. सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे (उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत) तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
३. आपल्या संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.
४. आपण आपल्या संस्थेच्या अध्यक्षांचे सदरची माध्यमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र (रु. २०/- च्या स्टँप पेपरवरील) आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे प्रतिस्वाक्षरीसह सादर करणे आवश्यक आहे.
५. आपली संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १९६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
६. संस्थेविरुध्द गंभिर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
७. सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
८. सदर संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबत तक्रारी नाहीत तसेच सदर संस्थेची एखादी शाळा शासनाने ताब्यात घेण्याचे प्रकरण प्रलंबित नाही.
९. सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.
१०. शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन २१०३/(५०/०३) माशि-२, दिनांक २७ मे, २००३ मधील अटी व शर्ती, कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहतील.

सदरचे पत्र प्राप्त होताच वरील १ ते १० विहित बाबींची पूर्तता केली असल्याचे संस्थेने सात दिवसाचे आत आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांना आवश्यक त्या कागदपत्रासह/प्रमाणपत्रासह कळवावे.

मूळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.
करिता

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे
आपण संबंधित अटींच्या संदर्भात आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची/प्रमाणपत्रांची तपासणी करुन प्रस्ताव तीन दिवसात आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा.
२. मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ - यांना सविनय सादर
३. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२. यांना सविनय सादर

Sandeep/ namasha-eng.04

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण [माध्यमिक] विभाग.
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/ 330/
नै.वाढ/0५.
पुणे. दिनांक : २६/९/२००५.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
प्रियदर्शनी हायस्कूल,
वाकी खुर्द, चाकण, ता. खेड, जि. पुणे.

विषय : नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. २००५-०६
===== इ.६ वी, इ.७ वी, इ.९ वी, इ.१० वी.
===================================

आपल्या हरदेवसिंग एज्यु. सोसायटी, भोसरी, पुणे-२८ या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित प्रियदर्शनी हायस्कूल, वाकी खु. ता. खेड. माध्यमिक विद्यालयास इ.८ वी/इ.५ वी चा वर्ग सुरु करणेस सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र.माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/२००५/०५, दि. २७/३/२००५ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ.६ वी, इ.७ वी, इ.९ वी, इ.१० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००५ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देण्यात येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे/गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती खेड यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ.१० वी चा वर्ग सुरु होत आहे, अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद, पुणे करिता